RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष १, अंक २०] बुधवार, जून ३, २०१५/ज्येष्ठ १३, शके १९३७ [पृष्ठे २, किंमत : रुपये २३.००

### असाधारण क्रमांक ३२

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

### राज्यपालांचे सचिव यांचे कार्यालय

राजभवन, मलबार हिल, मुंबई ४०० ०३५, दिनांक ३ जून २०१५

### अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक आरबी/टीसी/ई-१३०१३(४)/नोटिफिकेशन-वन निरीक्षक/४०९.— **ज्याअर्थी,** अधिसूचना क्रमांक आरबी/टीसी/ई-१३०१३(४)/ नोटिफिकेशन-१/४७४/२०१४, दिनांक ९ जून २०१४ (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे.) अन्वये भारतीय संविधानाच्या पाचव्या अनुसूचीच्या परिच्छेद-५ च्या उप-परिच्छेद (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी निर्देशित केले आहे की, यासंबंधी सध्या अस्तित्वात असलेला कोणताही अन्य कायदा किंवा नियम किंवा आदेश यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी " महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागास प्रवर्ग) कायदा, २००१ (महाराष्ट्र कायदा क्र. ८/२००१) चा कलम ४ आणि त्यासंबंधी तयार करण्यात आलेले अन्य कोणतेही नियम किंवा आदेश या सुधारणेच्या अधिन राहून लागू होतील की महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित क्षेत्र असलेल्या जिल्ह्यांमधील अनुसूचित क्षेत्रामधील उक्त अधिसूचने सोबतच्या परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या पदांपैकी सरळ सेवेने भरावयाची सर्व पदे आवश्यक शैक्षणिक अर्हता असलेल्या स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवारांमधूनच भरण्यात यावी ;

आणि ज्याअर्थी, राज्यातील अनुसूचित क्षेत्र असलेल्या जिल्ह्यांमधील अनुसूचित क्षेत्रासाठी महसूल व वन विभाग यांचे अंतर्गत असलेली वन निरीक्षक ही पदे सरळसेवेने भरावयाची आहेत, अशा पदांसाठी समान निर्देश देणे इष्ट आहे ;

आता, म्हणून, भारतीय संविधानाच्या पाचव्या अनुसूचीच्या परिच्छेद-५, उप परिच्छेद (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल उक्त अधिसूचना खालीलप्रमाणे सुधारित करीत आहेत.

उक्त अधिसूचनेच्या परिशिष्टामध्ये शेवटी खालीलप्रमाणे नोंद वाढविण्यात यावी :—

" १३. वन निरीक्षक ..... महसूल व वन विभाग. "

**चे. विद्यासागर राव,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**विकास चंद्र रस्तोगी,**
राज्यपालांचे सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.